Agro Inputs Manufacturers Association of India

Regd. No. MH323/2012

# Agro Inputs Manufacturers Association (of india)

दि. १९.११.२०१५

प्रति,

मा. संपादक,

ॲग्रोवन, सकाळ पेपर्स लि. पुणे.

विषय:- बोगस जैविक किडनाशक बाबत.

संदर्भ :- दि. १७.११.२०१५ ते १९.११.२०१५ रोजी ॲग्रोवन दैनिकामध्ये या बिषयीची प्रकाशित लेखमाला.

महोदय,

सर्व प्रथम आपले अभिनंदन, आपण "बोगस जैविक किड नाशकांचे जीवघेणे जग" ही लेख मालिका सुरू करुन शेतकऱ्यांमध्ये व शासनाच्या कृषी खात्यास या भयंकर प्रकाराची जाणीव करुन दिलीत. शेतकऱ्याच्या अज्ञानाचा व असाहयतेचा फायदा घेऊन काही बोगस उत्पादक वेगवेगळ्या कंपन्यांच्या नावाने बोगस जैविक किडनाशके बनवितात व ते अतिशय महागड्या किमतीमध्ये शेतकऱ्यांना विकतात हे वास्तव आपण प्रथमता आपल्या लोकप्रिय "ॲग्रोवन" दैनिकाच्या माध्यमातून चव्हाट्यावर आणलेत त्याबद्दल पुनश्च: एकवेळ आपले अभिनंदन.

याबाबत आपल्या लेख मालिकेशी पुरक अशी काही माहिती आम्ही आपणास देऊ ईच्छितो, आपल्या देशामध्ये कृषी निविष्ठाच्या माध्यमातून सध्या वेगवेगळ्या अशा तीन कायद्याअंतर्गत कामकाज पाहिले जाते. त्यामध्ये बियाणेसाठी, "सीड अक्ट" खतासाठी "फर्टिलायझर कंट्रोल ऑर्डर" आणि किडनाशकासाठी, "सेंन्ट्रल ईन्सेक्टिसाईड बोर्ड",या तीन वेगवेगळ्या कायद्याच्या माध्यमातून या कृषी निविष्ठा उत्पादन विक्रि व्यवसायावर शासनातर्फे नियंत्रण ठेवले जाते. मात्र या तीन प्रकाराव्यतिरिक्त शेतीमध्ये आणखी काही उत्पादनांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो, तो म्हणजे "प्लांट ग्रोथ प्रमोटर" व "प्लांट प्रोटेक्टर" या दोन कारणासाठी शेकडो प्रकाराची उत्पादने बाजारामध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत. मात्र या प्रकारातील उत्पादनाच्या निर्मितीसाठी व विक्रीसाठी सध्या कुठलाही वेगळा कायदा अस्तित्वात नाही किंबहुना सध्या अस्तित्वात असणाऱ्या कायद्याअंतर्गत या उत्पादनावर नियंत्रण ठेवता येत नाही.

ऑगस्ट २०१० मध्ये महाराष्ट्र शासनाने एक जी. आर. काढून अशा प्रकारच्या बिगर नोंदणीकृत कृषीनिविष्ठा उत्पादन व विक्रीसाठी काही नियमावली तयार केली होती व या बिगर नोंदणीकृत निविष्ठांना कायद्याअंतर्गत आणण्याचा प्रयत्न केला होता. मात्र यातील काही उत्पादक कोर्टामध्ये जाऊन त्याला तात्पुरता

Office Adderss : Chhatrapati Shivaji Market Yard, Shop No.6, 1st Floor. Madhyavarti Bhavan, Gultekdi, Pune- 411037
Ph-020-24274482 Email- info@aimassociationindia.com. Website-www.aimassociationindia.com

"स्टे" घेतला आहे, मात्र आम्ही काही उत्पादक एकत्र येऊन "ॲग्रो इन्पुटस मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनची" स्थापन करून शासनाने काढलेल्या या जी. आर. ची अमंलबजावणी करण्यासाठी शासनाच्या कृषी खात्याच्या सोबत राहुन या कायद्याची अमंलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाला सहकार्य करीत आहोत त्यासाठी शासनाने घातलेल्या अटींची पुर्तता करण्याचे काम आमचे असोसिएशन मागील चार वर्षापासून अतिशय हिरहिरीने करत आहे, मात्र शासन पातळीवर काही तांत्रीक कारणाने याची अमंलबजावणी करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. या बिगर नोंदणीकृत निविष्ठांना परवाना मिळणेसाठी आवश्यक असणाऱ्या शासकीय मान्यताप्राप्त संशोधन केंद्रामध्ये घेण्यात आलेल्या चाचण्या ही यातील सर्वात महत्वाची बाब आहे. आमचे असोसिएशन या बाबत स्वत: पुढाकार घेऊन कृषी आयुक्तालयाच्या परवानगीने सध्या विविध अशा १५ उत्पादनाच्या चाचण्या महाराष्ट्रातील विविध संशोधन केंद्रात घेत आहोत.

त्याचप्रमाणे यासाठी दुसरी महत्वाची बाब म्हणजे प्रत्येक उत्पादकाकडे उत्पादन तयार करण्यासाठी आवश्यक मशिनरी व त्याचे विश्लेषण करण्यासाठी प्रयोगशाळा असणे आवश्यक आहेत. आमच्या असोसिएशनमधील बहुतेक सर्वांकडे ही साधने आहेत, ज्याच्याकडे नाहीत त्यांना योग्य मार्गदर्शन करून ही साधने त्यांना उपलब्ध करून देण्याचे कार्य असोसिएशन करत आहे. या माध्यमातून आमच्या असोसिएशनची प्रामाणिक इच्छा आहे की शासनाने या उत्पादनासाठी कायद्याअंतर्गत नियमावली नुसार परवाने द्यावेत व सर्व उत्पादकाने शासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे उत्पादनाची निर्मिती करावी, जेणे करून शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही. यासाठी या कायद्याची अंत्यत आवश्यक्ता आहे. आपण ऐरणीवर आणलेल्या या विषयामुळे या संदर्भातील कायद्याला गती मिळण्याची शक्यता आहे.

या सर्व घडामोडीच्या अनुषंगाने आम्ही आपणास एक विनंती करीत आहोत, आपण उपस्थित केलेल्या या प्रश्नामुळे आता सर्व उत्पादकाकडे संशयाने पाहिले जाण्याची शक्यता आहे व त्याचा जे व्यावसायीक प्रामाणिकपणे व्यवसाय करित आहेत त्यांना त्याची झळ बसण्याची शक्यता आहे. तेव्हा आपणास विनंती आहे की, आपण या गोष्टीची दखल घेउन आमच्या असोसिएशन मधील प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या उत्पादकास याचे दुष्परिणाम भोगावे लागणार नाहीत याची आपण काळजी घ्यावी व तशा प्रकारचा संदेश आपल्या या मालिकेच्या माध्यमातून वाचकांना द्यावा. असे आपणास नम्र निवेदन करित आहोत या बाबत आपणास कसलीही माहिती हवी असल्यास आम्ही ती आपणास पुरविण्यास तयार आहोत.

धन्यवाद!

Received 3/2
C Mandar Mandale

आपले विश्वासु,

समीर पाथरे
सचिव,
ॲग्रो इन्पुटस मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन

Agro Inputs Manufacturers Association
Reg. No. 323

राजकुमार धुरगुडे
अध्यक्ष,
ॲग्रो इन्पुटस मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन